वागळे वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

महाराष्ट्र पोलीस ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ९६७ /२०२६ दि. ०९/०९/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका, ठाणेच्या क्षेत्रामध्ये **वागळे** वाहतूक उपविभागाचे हद्दीत JM BAXI प्रा.ली. कपनी सोमय्या हॉस्पीटल रोड, सायन ईस्ट यांच्या वतीने करण्यात येत आहे. सदर मुंबई मेट्रो प्रकल्प लाईन ४ वरील तीनहात नाका मेट्रो स्टेशन ठाणे येथे मॉडेला ते तीनहात नाका वाहिनीवर भारत पेट्रोल पंपाच्या पुढे मेट्रोचे कोच लाईनवर चढवण्याकरीता रस्ता वाहतुकिस बंद करून काम करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

प्रवेश बंद – **१)** मुबंईकडुन व रोड नं.१६ कडुन मॉडेला चेक नाका मार्गे तिनहातनाका जंक्शनकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **मॉडेला चेक नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची सर्व वाहने हि तिनहातनाका जंक्शन कडुन मॉडेला चेक नाक्याकडे येणाऱ्या वाहीनीवरील तीन लेन पैकी एका लेनचा वापर करुन इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसुचना खालील नमुद तारखांना अंमलात राहील.

१) दिनांक ०३/०९/२०२६ रोजी पासुन ते दिनांक ०५/०९/२०२६ रोजी रात्री २४:०० वा. ते सकाळी ०५:०० वा. पावेतो,
२) दिनांक ०६/०९/२०२६ रोजी पासुन ते दिनांक ११/०९/२०२६ रोजी रात्री २४:०० वा. ते सकाळी ०५:०० वा. पावेतो,
३) दिनांक २७/०९/२०२६ रोजी पासुन ते दिनांक ०९/१०/२०२६ रोजी रात्री २४:०० वा. ते सकाळी ०५:०० वा. पावेतो

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ व ५/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :—

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ, वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावी.